Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

**विद्यार्थी विकास विभाग**

Dr. T. M. Chougale
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/153 दि. 25 AUG 2025

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः— सन २०२५—२०२६ या शैक्षणिक वर्षाचे विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध शुल्क/निधी रक्कम पाठविणेबाबत.**

संदर्भः— विविध शुल्के भरण्याबाबतचे या विभागाचे संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/३५ दि. ०४/०६/२०२५ रोजीचे पत्रे

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, सन २०२५—२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, वर्ग १ व वर्ग २ अधिकारी, वर्ग ३ व वर्ग ४ सेवक, व संस्थाचालक पदाधिकारी यांचे कल्याण निधी रक्कम घेण्यात यावी व सदर होणारी रक्कम ताबडतोब विद्यार्थ्यांच्या प्रवेशानंतर एक महिन्यांच्या आत अंदाजपत्रकीय शिर्षक E.3.R.49 या खाती ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार सन २०२५—२०२६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या महाविद्यालयात **प्रवेशित विद्यार्थ्यांकडून** प्रती विद्यार्थी रु. १००/— याप्रमाणे कल्याण निधी रक्कम घेवून **संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यापीठामध्ये अंदाजपत्रकीय शिर्षक E.3.R.49 या खाती ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाची आहे.**

**जर प्रथम सत्र संपण्यापुर्वी निधी भरणा केली नाही तर एकूण रक्कमेवर १५% निधीसह रक्कम आकारण्यात येईल. एखाद्ये महाविद्यालय/संस्था दुर्घटना घडल्यानंतर कल्याण निधी रक्कम भरणा करत असल्यास सदर प्रस्तावाची रक्कम + आकारणी केलेली निधी + १५% अतिरिक्त निधी आकारण्यात येईल.**

सदरची रक्कम विद्यापीठाकडे जमा केल्याच्या पावतीची प्रत व कल्याण निधी धारकांची यादी खालीलप्रमाणे विहीत नमुन्यात विद्यार्थी विकास विभागाकडे त्वरीत जमा करावी. सदर पावती व यादी एकाच वेळी जमा करावी, यादी स्वतंत्रपणे जमा करून घेतली जाणार नाही. तसेच सदरची पावती व यादी जमा केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाचे कल्याण निधी प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

**कल्याण निधी भरलेल्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक यांची यादी मा. प्राचार्य यांच्या सहीने खालील नमुन्यात पाठविणे अनिवार्य आहे.**

विद्यार्थी :—

| अ. क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वय | वर्ग | वारसदाराचे नाव व नाते | आई व वडिल | वय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांची यादी नमुना :—**

| अ. क्र | शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे नाव | वय | वारसदाराचे नाव | नाते |
|---|---|---|---|---|
| | | | | |

या विभागामार्फत घेण्यात येणारी कल्याण निधी, युवक महोत्सव, अपघात/वैद्यकीय मदत निधी, युथ होस्टेल निधी, अविष्कार शुल्क हे **शैक्षणिक वर्ष २०२५ — २०२६ पासून संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे निधी/शुल्क विद्यापीठामध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाचे आहे.**

| | | | अंदाजपत्रकीय शिर्षक |
|---|---|---|---|
| १ | **कल्याण निधी** | प्रती विद्यार्थी — रु. १००/—<br>प्रती शिक्षक — रु. ५००/—<br>प्रती प्रशासकीय सेवक — रु. ३००/—<br>प्रती अधिकारी — रु. ५००/—<br>प्रती संस्थाचालक पदाधिकारी — रु. ७००/— | E.3.R.49 |
| २ | **युवक महोत्सव** | प्रती विद्यार्थी — रु. ९०/—<br>(विद्यापीठाकडे रक्कम रु. ५४/— व उर्वरीत रक्कम रु. ३६/— महाविद्यालयाकडे) | A.48.R.2 |
| ३ | **अपघात/वैद्यकीय मदत निधी** | प्रती विद्यार्थी — रु. २०/— | E.4.R.115 |
| ४ | **युथ होस्टेल निधी** | प्रती विद्यार्थी — रु. ५०/— | E.4.R.110.1 |
| ५ | **अविष्कार शुल्क** | प्रती विद्यार्थी — रु. २०/—<br>(विद्यापीठाकडे रक्कम रु. १५/— व उर्वरीत रक्कम रु. ५/— महाविद्यालयाकडे) | A.48.R.10 |

उपरोक्त प्रमाणे युवक महोत्सव व अविष्कार शुल्क अंतर्गत महाविद्यालयाकडे जमा होणारे शुल्क महाविद्यालयाने युवा महोत्सव व अविष्कार संशोधन स्पर्धामध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी खर्च करावयाचा आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ — २०२६ पासून जी महाविद्यालय युवा महोत्सव व आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी होणार नाहीत अशा महाविद्यालयाकडे जमा होणारे युवक महोत्सव व अविष्कार शुल्क विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

कळावे,

आपला विश्वासू

25/8/25

संचालक

विद्यार्थी विकास